# जयसिंगपूर - उदगांव सहकारी बँक लि. जयसिंगपूर.

## ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

जयसिंगपूर - उदगांव सहकारी बँक लि. जयसिंगपूर (ता. शिरोळ) या बँकेची सन २०१३-१४ वर्षाकरिता ५५ वी वार्षिक सर्व साधारण सभा बुधवार दिनांक १३-०८-२०१४ ई. रोजी दुपारी २.०० वाजता मर्चन्ट असोसिएशन हॉल, ९ वी गल्ली जयसिंगपूर येथे खालील विषयावर विचार विनिमय करणेकरिता बोलविणेत येत आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### * सभेपुढील विषय *

१) मागील दिनांक ०८/०८/२०१३ ई. रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने दिनांक ३१/०३/२०१४ अखेर संपलेल्या वर्षाचा शासकीय लेखापरिक्षकांनी अहवाल, ताळेबंद,नफा-तोटापत्रक स्वीकृत करणे.

३) सन २०१२-२०१३ या सालाचे शासकीय लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची वाचुन नोंद घेणे.

४) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१४-२०१५ चे अंदाज पत्रकास मंजूरी देणे व सन २०१३-२०१४ या सालात अंदाजपत्रकापेक्षा कमी -जादा झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे.

५) सन २०१३-२०१४ या सालातील झालेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजूरी देणे.

६) सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता अंतर्गत, कंकरंट हिशोब तपासणीस यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७) सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता शासकीय लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८) सन २०१३-२०१४ या सालातील शासकीय लेखापरीक्षक डॉ. ए. आर. ए. शिंदे चार्टर्ड अकौटंट यांचेकडून मिळालेला लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.

९) बँकेच्या मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना सन २०१३-२०१४ या सहकारी वर्षात दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

१०) सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता बाहेरील भांडवल उभारणेची कमाल मर्यादा ठरविणे.

११) सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या मान्यतेने तडजोडीने केलेल्या थकीत कर्ज वसुलीस मंजूरी देणे.

१२) बँकेच्या सभासदांना प्रशिक्षण देणेबाबत विचार विनियम करणे.

१३) बँकेने केलेल्या व करावयाच्या भांडवल गुंतवणुकीस मान्यता देणे.

१४) बँकेच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पुढील ५ वर्षाची व्यवसाय वाढ उद्दीष्टास मान्यता देणे.

१५) मे. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणारे विषयांवर चर्चा करणे.

**एस. बी. चौगुले.**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार

स्थळ - जयसिंगपूर.
दिनांक- २१.०७.२०१४

*** सभासदांना नम्र सूचना ***

१) बँकेच्या कामाकाजाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील तर सभासदानी दिनांक ०७/०८/२०१४ पूर्वी बँकेकडे लेखी कळवावे. २) गणसंख्येअभावी सभा तहकूब झालेस सदर सभा ठरलेल्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल. व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. ३) आपला पत्ता बदलला असलेस नवीन पत्ता प्रधानकार्यालयाकडे त्वरीत कळवावा. तसेच आपले पश्चात वारस नेमले नसलेस वारस त्वरीत नेमून घ्यावे. ४) सभासदांनी आपले भाग दाखले व मागील शिल्लक डिव्हीडंड बँकेच्या कामकाजाच्या वेळेत घेऊन जावे. ५) अहवालाच्या हिशोब पत्रकाच्या प्रती मुख्य कार्यालय व शाखा कार्यालय येथे सभासदांचे माहितीसाठी ठेवणत आलेल्या आहेत.



# अध्यक्षांचे मनोगत ...

**सन्माननीय बंधु-भगिनीनो**

**सप्रेम नमस्कार,**

जयसिंगपूर उदगांव सहकारी बँकेच्या ५५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण अगत्यपूर्वक उपस्थित राहिलात त्याबद्दल मी व्यक्तिश: व संचालक मंडळाचे वतीने सर्वाचे मन:पुर्वक हार्दीक स्वागत करीत आहे. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाची कामगिरी व फलनिष्पत्ती ठरवणारा दिवस ३१ मार्च २०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल व अर्थिक पत्रके आपणापुढे सादर करताना मला आनंद होत आहे पक्ष्चिम महाराष्ट्रातील सहकाराचे माहेरघर असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील आदरनिय आमदार **डॉ.श्री.आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटीलसाहेब,** चेअरमन श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.शिरोळ यांनी सामान्य जनतेच्या हितासाठी व समाजात निर्माण होणाऱ्या आर्थिक घटकाना बँकिंग सुविधा मिळाल्यास शेतकरी, कारागीर, बेरोजगार, व्यापारी, नोकरदार व कारखानदार यांचा आर्थिक विकास होईल व समाजास आर्थिक शिस्त लागेल या अत्यंत दुरदृष्टीने सन १९६० साली बँकेची स्थापना केली. तसेच आपला आभ्यास, कार्यकुशलता व प्रचंड इच्याशक्तीच्या जोरावर **उद्यानपंडीत मा.श्री गणपतराव पाटीलसाहेब** यांच्या मार्गदशनाने बँकेने लक्षणीय प्रगती साध्य केली आहे. सन २०१३-२०१४ या वर्षात बँकेने सर्वच क्षेत्रात उत्तम प्रगती केलेली आहे. बँकेस व्यवसायासाठी कोल्हापूर व सांगली जिल्हा कार्यक्षेत्र मंजूर असुन या आर्थिक वर्षात दत्तवाड येथे नवीन शाखा सुरू झालेली आहे. याच आर्थिक वर्षात कोअर बँकिग सुविधेचा शुभारंभ होऊन पुर्णपणे कार्यान्वित झाली आहे. बँकेने रूपये २०० कोटी व्यवसायाचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. अतिरिक्त निधीची फायदेशीर गुंतवणुक व आर्थिक वर्षात वाढत गेलेल्या बँक व ठेव व्याजदराचा बँकेने फायदा उठवत १ कोटी ४० लाख इतका उच्चांकी ढोबळ नफा मिळविला आहे. अशा रितीने कार्यविस्तार, उद्दिष्ट पुर्ती, व्यावसायिक व्यवस्थापन, अर्थिक शिस्त व आधुनिक तंत्रज्ञान याव्दारे बँकेने गौरवास्पद कामगिरी केलेली आहे. उत्पादन क्षमता टिकून राहावी यासाठी बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे कर्मचार्यांची उत्पादन क्षमता वाढून प्रति सेवक व्यवसायात रू.३९.८२ लाखांची वाढ होऊन तो रू. २४८.२७ लाख झाला आहे. तसेच प्रति सेवक नफा रू.०.९४ लाख इतका झालेला आहे. हे बँकेच्या सक्षमीकरणाचे द्योतक आहे.''हायटेक'' तंत्रज्ञानाचा अवलंब करीत असताना बँकेने सर्वसाधारण सभासद खातेदार ग्राहक ठेवीदार कर्जदार इत्यादी घटकांशी असणारा संबध दुरावणार नाही याची दक्षता घेतली आहे. बँकेच्या तसेच शाखेच्या वर्धापनदिन निमित्ताने होणाऱ्या ग्राहक भेटीत ग्राहकांच्या सूचना अपेक्षा ग्राहकांचे समाधान इत्यादी बाबी व्यवस्थापनापर्यंत पोहचतात. त्यामुळे बँकवाढीस पोषक धोरण ठरवण्यात मदत होते. बँकेने सन २०१७ अखेर संभाव्य व्यवसाय आराखाडा तयार केला असुन बँक त्या प्रारूप आराखडयानुसार मार्गक्रमन करीत असून त्यानुसार बँकेचा विकास व विस्तार यात निश्चित यश प्राप्त होईल.

**सन २०१३-२०१४ च्या अर्थिक वर्षाचा आढावा**

अहवाल सालामध्ये बँकेने दरवर्षी प्रमाणे वाटचाल सुरू ठेवली असुन ही बाब तुलनात्मक आकडेवारीवरून लक्षात येइल.

**बँकेची तुलनात्मक सांपतीक स्थिती.**

| अ.नं | तपशील | ३१/०३/२०१२ | ३१/०३/२०१३ | ३१/०३/२०१४ |
|---|---|---|---|---|
| १. | सभासद संख्या | ९१३८ | ९६४३ | १०५०५ |
| २. | अधिकृत भाग भांडवल | ३,००,००,०००/- | ३,००,००,०००/- | १०,००,००,०००/- |
| ३. | वसूल भाग भांडवल | १,८३,७६,४७५/- | २,२२,१०,०७५/- | ३,२३,७३,१००/- |
| ४. | राखीव व इतर निधी | ६,९३,१३,२१६/- | ७,२८,४९,२११/- | ७,८८,४९,४६०/- |
| ५. | ठेवी | ७४,२७,४८,९४१/- | १,१०,५३,७०,२३३/- | १,३७,७९,२५,८९८/- |
| ६. | कर्जे | ३६,१४,३६,२१९/- | ५२,०५,६३,२०१/- | ६५,७८,१७,८२५/- |
| ७. | गुंतवणुक | ३९,०६,८८,५८०/- | ५७,०५,६१,२४८/- | ५७,३५,०८,६१८/- |
| ८. | नफा | ६६,१३,९१२/- | ६७,७३,८५२/- | ७७,२७,०१३/- |
| ९. | ढोबळ एन.पी.ए. | ७.४७% | ४.५१% | ५.५४% |
| १०. | निव्वळ एन.पी.ए | ०.००% | ०.००% | ०.९४% |
| ११. | भांडवल पर्याप्तता | १४.५८% | १२.२४% | १२.२८% |
| १२. | लांभाश | १०.००% | १०.००% | १२.००% (शिफारस) |
| १३. | ऑडीट वर्ग | ''अ'' | ''अ'' | ''अ'' |

**सभासद -**

अहवाल सालात गतवर्षीच्या ९६४३ सभासदात ९१२ ने वाढ झालेली असून ५० सभासद कमी झालेने वर्षाअखेरीस एकूण सभासद संख्या १०५०५ इतकी आहे. अहवालसालात वसुल भाग भांडवलामध्ये १०१.६३ लाख इतकी वाढ झालेली आहे.

**भाग भांडवल:-**

बँकेचे अधिकृत भागभांडवल रूपये दहा कोटींचे असून अहवाल साल अखेर वसूल भागभांडवल रूपये ३२३७३१००/- इतके आहे. भाग भांडवल वाढीचे प्रमाण ४६ टक्के आहे. बँकेच्या वाढत्या व्यवसायास अनुरूप असे भागभांडवल असणे जरूर असल्यामुळे एक लाख समभागामध्ये विभागले गेलेले प्रत्येकी रूपये एक हजारचे समभाग असलेले अधिकृत भागभांडवल रूपये दहा कोटीचा प्रस्ताव नविन पोटनियम दुरूस्तीसह सहकार खात्याकडे सादर केला असता त्यास सहकार खात्याने मंजूरी दिली आहे.

सहकार कायद्यातील सुधारणेनुसार बँकेच्या पोटनियमात बदल करणेत आला असुन बँकेच्या प्रत्येक भागाची किंमत रू.१००/- वरून रू.१०००/- करणेत आला आहे.तरी सभासदानी जरूर त्या रक्कमेचा भरणा करून आपले भागभांडवलातील हिस्सा रू.१०००/- च्या पटीत तातडीने करून घ्यावा.

**राखीव व इतर निधी :-**

बँकेचा आर्थिक पाया भक्कम होण्यासाठी भागंभाडवलाबरोबरच राखीव व इतर निधीची पुरेशी तरतूद असणे तितकेच महत्वाचे आहे.३१ मार्च २०१४ अखेर गगांजळी रू.२,३७,०३,२८४.०० व इतर निधी रू. ५,५१,४६,१७६.०० असे मिळून एकूण स्वनिधी रू.७,८८,४९,४६०.०० असा आहे. अहवाल वर्षातील नफा विभागणी नंतर स्वनिधी रू.८,२७,६७,६१४.०० इतका होईल. बदलत्या धोरणांना सक्षमपणे सामोरे जात दरवर्षीच्या नफ्यातून अधिकतर भाग निधींकडे वळवून बँकेने निधीमध्ये वाढ केलेली आहे. बँकेचा आर्थिक पाया किती भक्कम आहे यावरच बँकेचे आस्तित्व व सभासदांचे हिताचे रक्षण अवलंबून असते.

**भांडवल पर्याप्तता -**

रिझर्व बॅक ऑफ इंडीयाच्या निकषानुसार भांडवल जोखीम पर्याप्तता प्रमाण (CRAR) बॅकेस किमान ९.००% असणे आवश्यक असताना हे प्रमाण आपल्या बॅकेने १२.२८% इतके राखले आहे. यावरून आपल्या बॅकेची आर्थिक क्षमता दिसुन येते.

**ठेवी -**

अर्थिक स्थैर्याच्या जोरावर समाजामध्ये विश्वसार्हता निर्माण केलेने ठेवीचे व्याजदर अन्य बँकांच्या तुलनेने कमी ठेवूनही बँकेच्या ठेवीमध्ये वाढ झालेली आहे. दि.३१.०३.२०१३ रोजी बँकेच्या एकूण ठेवी रू.११०५३.७० लाख इतक्या होत्या वर्षभरात त्यामध्ये रू.२७२५.५५लाखाची वाढ होऊन दि.३१.०३.२०१४ अखेरीस बँकेच्या ठेवी रू.१३७७९.२६ लाख इतक्या झाल्या आहेत. ठेवीदारांच्या ठेव रक्कमेच्या सुरक्षेसाठी ठेवींचा विमा डि.आय.सी.जी.सी यांचेकडे उतरविला असून त्यांचा विमा हप्ता नियमितपणे प्रत्येक सहामाहीस आगाऊ भरला जातो

**कर्जे –**

बँकेच्या ठेवी जितक्या जास्त तितकी बँक सुदृढ ही संकल्पना आता बदललेली आहे. आता बँकेच्या व्यवसायास महत्व प्राप्त झालेले आहे. व्यवसाय म्हणजे ठेवी + कर्जे होय. त्यातही कर्जे अधिक महत्वाची ठरतात. दि.३१.०३.२०१३ रोजी बँकेची एकूण कर्जे रू.५२०५.६३ लाख इतकी होती.अहवाल सालात त्यात रू.१३७२.५५ लाखाची वाढ होऊन अहवाल साल अखेर कर्जे रू.६५७८.१८ लाख इतकी झाली आहेत. कर्ज वाढीचा वेग २६.३७ टक्के इतका आहे.

**अगकम क्षेत्रास कर्जपुरवठा –**

आपल्या बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अग्रक्रम क्षेत्रास रू.५०३४.२० लाख इतका कर्ज पुरवठा केला असून त्याचे एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ७६.५३ टक्के आहे.तसेच दुर्बल घटकांना रू. १३६२.४६ लाख इतका कर्ज पुरवठा केला असून त्याचे एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण २०.७१ टक्के आहे.

**गुंतवणूक –**

कर्जव्यवहारानंतर ताळेबंदाची जिंदगी दर्शवणारी दुसरी महत्वाची बाजु म्हणजे गुंतवणूक, गुंतवणूक ही कर्ज व्यवहाराइतकी फायदेशीर नसली तरी रिझर्व्ह बँकेच्या CRR व SLR बाबतच्या तरतुदीचे काटेकोर पालन करून गुंतवणूकीचे व्यवस्थापन केले आहे. रिझर्व्ह बँकेच्या सुधारित नियमानुसार दि.३१.०३.२०११ पासुन बँकेची २५ टक्के गुंतवणूक गव्हर्मेट सिक्युरिटीत असणे आवश्यक आहे. बँकेने या आदेशाचीही पुर्तता केली आहे. त्यामुळे गव्हर्मेंट सिक्युरिटी व्यवहाराला महत्व प्राप्त होऊ लागले आहे. गतवर्षी बँकेची एकूण गुंतवणूक रू.५७०५.६१ लाख इतकी होती. अहवाल सालात गुंतवणुकीमध्ये रू.२९.४७लाख इतकी वाढ झाली असून दि.३१.०३.२०१४ अखेर एकूण गुंतवणूक रू.५७३५.०९ लाख इतकी आहे. सरकारी कर्जरोख्याची खरेदी–विकी करून बँकेने अहवाल सालात एकूण रू.१८.१६ लाख इतका नफा कमावला आहे. कोअर बँकिंग प्रणालीमुळे बँकेकडील उपलब्ध अतिरिक्त निधीचे सुयोग्य नियोजन करणे शक्य झाले आहे.

**संगणकीकरण व तंत्रज्ञान –**

बँकेने प्रधान कार्यालय जयसिंगपूर येथील मुख्य इमारतीत अद्यावत व सुसज्ज असे डाटा सेंटर उभारले आहे. कोअर बँकिंग सोल्युशन (CBS) चे कामकाज पूर्ण झालेले आहे. सर्व शाखा डाटा सेंटरला जोडण्यात आलेल्या असुन सर्व शाखांकरिता Centralised Activity कार्यान्वीत झालेल्या आहेत. याचा सर्वच ग्राहकांना लाभ होत आहे. या सुविधाव्दारे ग्राहकांना बँकेच्या कोणत्याही शाखेतून बँकिंग सुविधा मिळत आहे. बँकेने शाखा दत्तनगर व शाखा जयसिंगपूर येथे ए.टी.एम सुविधा उपलब्ध असुन बँकेच्या ग्राहकांना दोन्हीही ए.टी.एम मधुन रक्कम काढता येते. सध्या बँकेने आय.सी.आय.सी.आय.बँकेमार्फत RTGS सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

बँक लवकरच (NPCI) च्या माध्यमाद्वारे ग्राहकांना कोणत्याही बँकेच्या ए.टी.एम मधुन कोठेही पैसे काढता येतील तसेच इंटरनेट बँकीग व मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध होणार आहे.

**नफा विभागणी –**

नियोजन व समयबध्द पध्दतीची आर्थिक धोरणे, स्पर्धात्मक मानसिकता ,व्यावसायिक दृष्टीकोन, ग्राहकाभिमुक सेवा, आधुनिक तंत्रज्ञान तसेच कार्यक्षमता व प्रभावी वसुली राबविल्याने थकीत कर्जाची चागंली वसुली झाली.त्यामुळे बँकेची नफा क्षमता वाढलेली दिसुन येते. वर्षाअखेरीस बँकेचा करपुर्व ढोबळ नफा रू.१,४०,२२,८२८.४५ इतका आहे. त्यातुन संशयीत व बुडीत कर्ज निधी रू.७,८०,०००.०० ऑडीट फी तरतुद रू.५,००,०००.०० आयकर तरतुद रू.२५,००,०००.०० बोनस तरतुद रू.९,५०,०००.०० सरकारी कर्जरोखे अधिमुल्य निर्लेखन रू.१०,६५,८१५.०० उत्तम जिंदगी तरतुद रू.५,००,०००.०० अशा एकूण तरतूदी रू.६२,९५,८१५.०० वजा जाता निव्वळ नफा रू.७७,२७,०१३.४५ इतका झाला आहे. त्याची विभागणी करणेस संचालक मंडळाने खालीलप्रमाणे शिफारस केली आहे. तरी नफा विभागणीस मंजूरी द्यावी ही विनंती.

| अ. नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | रिझर्व्ह निधी २०% | ₹ १.९५.०००.०० |
| २. | जनरल रिझर्व्ह निधी १०% | ₹ ७.७५.०००.०० |
| ३. | लाभांश १२% (शिफारस) | ₹ २६.६५.२०९.०० |
| ४. | निवडणुक निधी | ₹ २०.०००.०० |
| ५. | शिक्षण निधी | ₹ १.००.०००.०० |
| ६. | गुंतवणूक चढउतार निधी | ₹ १.००.०००.०० |
| ७. | तंत्रज्ञान विकास निधी | ₹ १.००.०००.०० |
| ८. | आयकर तरतूद | ₹ ११.४३.६५०.०० |
| ९. | इमारत निधी | ₹ ८.७३.१५४.४५ |
| | | ₹ |
| | | ₹ |
| | एकूण - | ₹ ७७,२७,०१३.४५ |

**अनुत्पादक कर्जे (N. P. A.) व तरतुद -**

बँकेने संपूर्ण वर्षभर आदर्श व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करून नियोजन व सातत्यपुर्ण वसुली प्रक्रिया राबविलेने दि.३१.०३.२०१४ अखेर एकूण येणे कर्जबाकीपैकी रू.३६४.२२ लाख इतक्या रक्कमेची कर्ज उत्पन्न क्षमता नसलेल्या (एन.पी.ए) कर्जे असुन त्याचे ढोबळ प्रमाण ५.५४ टक्के आहे. या कर्ज येणे पोटी अहवालसाल अखेर रू.३,०५,००,०००.०० इतकी तरतुद केली असुन निव्वळ उत्पन्न क्षमता नसलेल्या (एन.पी.ए) कर्जाचे प्रमाण शेकडा ०.९४ टक्के आहे.

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे इन्सपेक्शन -**

बँकेचे दि.३१.०३.२०१३ अखेरचे रिझर्व्ह बँकेचे इन्सपेक्शन मा. पठारेसो यांनी पूर्ण केले असून बँकेची सांपत्तिक स्थिती, नफाक्षमता, ठेव संकलन, वसुली, प्रशासकीय व्यवस्थापन इत्यादी कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून गौरवोद्गगार काढले आहेत. त्यांनी काही मौलिक सूचना केलेल्या आहेत. त्याबद्दल बँक त्यांची अत्यंत आभारी आहे.

**वैधानिक लेखापरीक्षण -**

बँकेचे सन २०१३-२०१४ चे वैधानिक लेखापरीक्षण डॉ.आर.ए.शिंदे, चार्टर्ड अकौटंट यांनी केले असून बँकेस लेखापरीक्षण वर्ग ''अ'' दिलेला आहे. लेखापरीक्षण कालावधीत त्यानी बँकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून काही मौलिक सूचना केलेल्या आहेत त्याबद्दल बँक त्यांची अत्यंत आभारी आहे. याव्यतीरीक्त बँकेचा स्वत:चा ऑडीट विभाग असून त्यामार्फत सर्व शाखांचे नियमीत लेखापरीक्षण केले जाते.

**संचालक मंडळ व उपसमिती सभा -**

बँकेच्या प्रगतीमध्ये धोरणातील सकारात्मक व प्रोत्साहनात्मक सहकार्य आणि सर्व निर्णय एकमताने मंजूर केलेने बँकेचे कामकाज सुरळीत व प्रगतीपथावर नेणेसाठी संचालक मंडळातील सर्व सदस्यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. अहवालसालात संचालक मंडळ व उपसमित्याच्या एकूण ४३ सभा झाल्या आहेत.

**शाखाविस्तार व आधुनिकीकरण -**

बँकेच्या प्रधान कार्यालय नुतनीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे.अहवाल सालात बँकेने ''दत्तवाड'' येथे नवीन शाखा कार्यान्वीत केली असून या शाखेसह बँकेच्या एकूण १० शाखेमधून कामकाज चालू आहे. चालु आर्थिक वर्षासाठी सांगली जिल्हयातील मिरज व कोल्हापूर जिल्हयातील दानोळी व शिरढोण येथे तीन नवीन शाखेचा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे प्रस्ताव पाठवला आहे. आपल्या चंदूर शाखेसाठी स्वमालकीची इमारत असावी या उद्देशाने बँकेने चंदूर येथे खुला प्लॉट खरेदी केला असून येत्या आर्थिक वर्षात त्यावर शाखेच्या इमारतीचे बांधकाम करीत आहोत.त्याचप्रमाणे कवठेगुलंद शाखेसाठी स्वमालकीची इमारत व कुरूदवाड शाखेसाठी वाढीव बांधकाम करणेचा मानस आहे.

**सेवक वर्ग -**

अहवाल साल अखेर बँकेत एकूण ८२ सेवक वर्ग असुन त्यापैकी २७ अधिकारी,३८ लिपिक, शिपाई, वॉचमन व स्विपर मिळून १७ अशी वर्गवारी आहे. संस्थेची प्रगती ही सेवकांची निष्ठा व कार्यक्षमता यावर अवलबून असते. बँकींगसारख्या सेवा क्षेत्रामध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे असते. बँक व्यवस्थापन व कर्मचारी यांच्यातील संबध सुलोख्याचे व परस्पर सहकार्याचे राहीले आहेत. कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, सुखसोयी व प्रगती यासाठी बँक सदैव प्रयत्नशील असते. बँकेने कर्मचाऱ्यासाठी प्रा.फंड, ग्रॅच्युईटी, फॅमिली पेन्शन, बोनस या योजना लागु केल्या आहेत. अहवालसालात सेवकवर्गासाठी अपघात वैद्यकीय विमा योजना अमलात आणून त्यांच्याप्रती बँकेला असलेली कळकळ व्यक्त केली आहे. ठेववृध्दी व कर्ज वसुली यांची उध्दीष्टे पुर्ण करणेसाठी त्यांनी केलेल्या अथक

प्रयत्नाबद्दल मी त्यांचे आपणा सर्वांतर्फे अभिनंदन करतो. यापुढेही बँकिंग क्षेत्रातील तीव्र स्पर्धा व नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यास सेवकांनी सिध्द रहावे व आपल्या बँकेचे नाव उज्वल करावे असे मी त्यांना आवाहन करतो.

**सेवक प्रशिक्षण -**

प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांना बँकीग क्षेत्रातील नविन बदल लागु होणारे निकष, कायदे यांचे सखोल ज्ञान होते. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व आपुलकीची भावना विकसीत होते. प्रशिक्षित सेवक वर्ग संस्थेचे भुषण असते. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातुनच संस्था मोठी होत असते. बँकेतील कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढावी. यासाठी त्यांना चांगल्या दर्जाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. अहवाल सालात संचालक, अधिकारी, क्लार्क व शिपाई यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा प्रशिक्षण विभाग, तात्यासाहेब मोहीते सहकार प्रशिक्षण केंद कोल्हापूर, कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स असोशिएशन कोल्हापूर, वैकूंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्था, पुणे व इतर स्थानिक व्याख्याने इत्यादीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा बँकेने कर्मचाऱ्यांना लाभ उपलब्ध करून दिला आहे.

**पोटनियम दुरूस्ती -**

९७ व्या घटना दुरूस्तीनुसार बँकेने आपल्या पोटनियमात आवश्यक त्या दुरूस्त्या करून १५ एप्रिल २०१३ च्या विशेष सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने नविन पोटनियम मंजूरीसाठी सहकार खात्याकडे सादर केले असता. त्यास सहकार खात्याने मंजूरी दिली आहे.

**आभार व समारोप -**

बँकेच्या प्रगतीस बँकेचे संस्थापक आदरणीय आमदार डॉ. श्री. आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटीलसाहेब यांचे मौलीक मार्गदर्शन मिळालेने मी त्यांचा शतश: ऋणी आहे. बँक आजवर जी भक्कम आर्थिकप्रगती यश संपादन करू शकली व जो नावलौकीक मिळाला आहे.ते आपण सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक, सेवा पुरवठादार, विविध संस्था, उघोजक, कारखानदार यांनी बँकेला सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करून त्या सर्वाचे आभार मानतो.

रिझर्व्ह बँकेचे अधिकारी, विभागीय सहनिबंधकसो, लेखापरीक्षक, मा.जिल्हा उपनिबधंकसो, मा असिस्टंट रजिस्टार, सहकार खाते, माझे सहकारी संचालक व शाखा सल्लागार, कायदा सल्लागार, कर सल्लागार, व्हॅल्युएटर, बँकेचे सराफ, दि.एम.एस.सी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, बँक फेडरेशन, बँक असोसिएशन कोल्हापूर, श्री.दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि, शिरोळ. यांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखापाल, शाखाधिकारी, अधिकारी व सेवक वर्ग यांनी बँकेच्या प्रगतीत सिंहाचा वाटा उचललेला आहे याचा मला व माझ्या सहकाऱ्यांना अभिमान आहे.

आपणा सर्वाचे वाढते प्रेम, विश्वास व सहकार्याच्या पाठबळावर बँकेचा विकास हाच ध्यास मनात कायम करीत बँकेच्या प्रगतीतील सातत्य असेच पुढे चालु राहील अशी ग्वाही देतो व माझ्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करतो व मा. संचालक मंडळाच्या वतीने बँकेचा सन २०१३-२०१४ सालाचा ताळेबंद नफा-तोटापत्रक व अंदाजपत्रक व नफा-विभागणी आपल्या समोर सादर करत असून त्यास सभासदांनी मंजूरी द्यावी अशी विनंती करतो.

**धन्यवाद**

**।। जय हिंद ।। जय महाराष्ट्र ।। जय सहकार ।।**

आपला नम्र,
**महादेव बाबू राजमाने**
चेअरमन

स्थळ : जयसिंगपूर
दिनांक : २१.०७.२०१४

# शासकीय लेखा परिक्षकांचा अहवाल

मी जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि.,जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर या बँकेचे दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक व दिनांक ३१ मार्च २०१४ रोजीचा परिशिष्टीय ताळेबंद, बँकेने ठेवलेली हिशोबी पुस्तके, व्हौचर्स व मला उपलब्ध करुन दिलेल्या अन्य कागदपत्रांवरुन तपासला असुन माझे वैधानिक लेखापरिक्षणाचे कामासाठी व त्याचे पुर्ततेसाठी मला आवश्यक ती माहिती व खुलासे मिळाले आहेत. त्यानुसार माझ्या मते..

१) हिशोबी पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टीत्पतीस येईल त्यावरुन, बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षीत असल्यानुसार योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

२) मी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रके, बँकेच्या हिशोबांच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहेत.

३) माझ्या मते, देण्यात आलेल्या संपूर्ण माहिती प्रमाणे, तसेच मला प्राप्त झालेल्या सर्व शाखांच्या हिशोब पत्रकानुसार आणि मला देण्यात आलेल्या खुलाशावरुन, हे हिशेब महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या १९६० व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती माहिती देतात. माझ्या लेखापरिक्षण अहवाल भाग 'अ', 'ब', 'क' व परिशिष्ठ यामध्ये नमूद केलेल्या अवलोकनास अनुसरुन

अ) ताळेबंद पत्रकाबाबत दि. ३१ मार्च २०१४ या दिवशीच्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा व

ब) नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवित आहे.

४) सन २०१३-२०१४ या वर्षासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० खालील नियमानुसार बँकेस **''अ''** वर्ग कायम करणेत येत आहे.

Dr. R. A. SHINDE M. No. 047975 CHARTERED ACCOUNTANT

स्थळ : जयसिंगपूर

दिनांक : १८/०७/२०१४

**डॉ. आर. ए. शिंदे,**

चार्टर्ड अकौंटंट

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ३,००,००,०००-०० | **अधिकृत भाग भांडवल** | | १०,००,००,०००-०० |
| | (अधिकृत भाग भांडवल १,००,००० भाग प्रत्येकी रू. १०००/- प्रमाणे) | | |
| २,२२,१०,०७५-०० | **वसूल भाग भांडवल** | | ३,२३,७३,१००-०० |
| **७,२८,४९,२११-६५** | **राखीव व इतर निधी** | | ७,८८,४९,४६०-१५ |
| २,१७,९९,१६३-६५ | राखीव निधी | २,३७,०३,२८३-९० | |
| ९८,००,०००-०० | इमारत निधी | १,०५,१६,१२८-२५ | |
| १६,००,०००-०० | लाभांश समिकरण निधी | १६,००,०००-०० | |
| २,९७,२०,०००-०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ३,०५,००,०००-०० | |
| ५,४०,०००-०० | धर्मादाय निधी | ५,४०,०००-०० | |
| २५,००,०००-०० | गुंतवणूक तरतूद | २५,००,०००-०० | |
| ३,००,०००-०० | सेवक कल्याण निधी | ३,००,०००-०० | |
| १०,००,०००-०० | सभासद कल्याण निधी | १०,००,०००-०० | |
| १८,१०,०००-०० | गुंतवणुक घसारा निधी | ३९,१०,०००-०० | |
| १९,००,०००-०० | उत्तम जिंदगीसाठी तरतूद | २४,००,०००-०० | |
| १८,८०,०४८-०० | इतर संशयीत बुडीत निधी | १८,८०,०४८-०० | |
| **१,१०,५३,७०,२३३.१३** | **एकूण ठेवी** | | १,३७,७९,२५,८९८-१४ |
| **२९,४५,५७,९१३-४७** | **सेव्हिंग ठेवी** | **३८,३१,६०,६८२-८०** | |
| २६,३३,६२,९५५-१३ | अ) व्यक्ती | ३४,९७,२७,६८३-०८ | |
| ३,११,९४,९५८-३४ | ब) संस्था | ३,३४,३२,९९९-७२ | |
| ६,३२,६३,७८२-०६ | **चालू ठेवी** | **८,३१,८२,००१-७४** | |
| १,०६,७३,२१७-०८ | अ) व्यक्ती | २,१४,८२,९९७-४० | |
| ५,२५,९०,५६४-९८ | ब) संस्था | ६,१६,९९,००४-३४ | |
| **७४,७५,४८,५३७-६०** | **मुदत ठेवी** | **९१,१५,८३,२१३-६०** | |
| १७,४८,९८,७७५-०० | अ) व्यक्ती | २०,४०,०९,८९०-०० | |
| १७,०७,५०,०२१-०० | ब) संस्था | २०,४६,५६,६४७-०० | |
| २९,५९,४५,७०६-०० | क) पुर्नगुंतवणुक ठेव | ३१,७१,०८,३०९-०० | |
| **१,०९,४४,७५,४८४-१८** | **बेरीज पुढील पानावर** | | १,३०,३३,४०,०९०-६९ |



कोणतेही खाते उघडताना ओळखपत्र व वास्तव्याचा दाखला आवश्यक आहे.

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **६,८८,४६,३६९-८३** | **रोख शिल्लक व बँक शिल्लक** | | २१,३८,०४,६८७-१४ |
| १,५८,३५,७८३-५३ | हातातील रोख शिल्लक | २,१५,५८,७२१-२३ | |
| ३,३१,२४,७१९-४४ | बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | ३,७५,६८,२७९-०८ | |
| १७,९२,५४४-१८ | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा शिरोळ | २५,३९,६३६-०८ | |
| ८४,८६,४२१-७८ | दि एम.एस.सी. बँक लि. शाखा मुंबई | ११,३०,२७,७०१-९१ | |
| २२,२०१-२० | के.डी.सी.सी बँक शाखा जयसिंगपूर | ३१,७६,९०५-७० | |
| १२,२५,७६८-६३ | के.डी.सी.सी बँक शाखा इचलकरंजी | ५,२१,५५७-७१ | |
| १८,२७७-६६ | के.डी.सी.सी बँक शाखा कोल्हापूर | १८,२७७-६६ | |
| २२,१७,४२७-०१ | के.डी.सी.सी बँक शाखा कुरूंदवाड | ३५,५६,२१२-९१ | |
| ८,९८,१३०-८६ | के.डी.सी.सी बँक शाखा अब्दुल लाट | १४,८३,३०७-८६ | |
| २,७९,५५१-३७ | के.डी.सी.सी बँक शाखा शिरोळ | २८,५२,४०८-८३ | |
| ३९,१०,७०४-०० | के.डी.सी.सी बँक शाखा कवठेगुलंद | १६,९४,८८२-०० | |
| ०-०० | के.डी.सी.सी बँक शाखा खिद्रापूर | ३,४२,५००-०० | |
| ०-०० | के.डी.सी.सी बँक शाखा दत्तवाड | ९,०५,०००-०० | |
| १०,०७,२३८-१७ | एस.डी.सी.सी बँक शाखा सांगली | १४,११८-१७ | |
| २७,६०२-०० | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा इचलकरंजी | २७,०५२-०० | |
| ०-०० | युनीयन बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | २,४५,१८,१२६-०० | |
| **३,८८,९५,४६४-६८** | **इतर बँकातील शिल्लक** | | ४,९१,१७,१७१-२८ |
| ८,५६८-५६ | आय.सी.आय.सी.आय बँक शाखा कोल्हापूर | ०-०० | |
| १,६४,२४,८३५-४५ | आय.सी.आय.सी.आय बँक शाखा जयसिंगपूर | २,७७,८६,९४७-३७ | |
| ८,४६,१०७-१७ | दि. फेडरल बँक लि. शाखा जयसिंगपूर | १,९५,०४१-१७ | |
| ४०,६४,५७२-४० | आय.डी.बी.आय. बँक शाखा इचलकरंजी | ५२,१५,८७५-६५ | |
| १,७५,५१,३८१-१० | श्री वीरशैव सह. बँक शाखा जयसिंगपूर | १,५९,१९,३०७-०९ | |
| **५७,०५,६१,२४८-००** | **एकूण गुंतवणुक** | | ५७,३५,०८,६१८-०० |
| ३३,३४,४४,३३०-०० | **मुदत बंद ठेवी** | **१२,७२,८१,०००-००** | |
| १,२८,४२,०००-०० | के.डी.सी.सी बँक शाखा जयसिंगपूर | २,३९,३१,०००-०० | |
| १०,००,०००-०० | के.डी.सी.सी बँक शाखा इचलकरंजी | १०,००,०००-०० | |
| ३,०३,५२,३३०-०० | स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा शिरोळ | ४,००,००,०००-०० | |
| ४,०४,००,०००-०० | बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | ०-०० | |
| २,०१,००,०००-०० | आय.डी.बी.आय बँक शाखा इचलकरंजी | ०-०० | |
| ३,९६,००,०००-०० | सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा शिरोळ | ०-०० | |
| २५,२०,३६,१६४-५१ | **बेरीज पुढील पानावर** | | ३२,७८,५२,८५८-४२ |

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१,०९,४४,७५,४८४-१८** | **मागील पान बेरीज** | | **१,३०,३३,४०,०९०-६९** |
| २७,३१,१५७-०० | ड) दामदुप्पट ठेव | २३,२०,३८९-०० | |
| ४,८८,५००-६० | इ) लखपती ठेव | ५,३७,५५३-६० | |
| ५,७५,१०५-०० | ई) सुवर्ण महोत्सव ठेव | ०-०० | |
| ५,४३,११,०७२-०० | ग) सिध्दीविनायक ठेव | ०-०० | |
| ३,३३,४२,३४४-०० | घ) मुदत बाह्य ठेवी | ४,१८,०१,५२९-०० | |
| १,२९,७२,३६७-०० | च) अल्पबचत ठेवी | १,५२,६०,००७-०० | |
| १५,३३,४९०-०० | ज्ञ) रिकरिंग ठेवी | २८,६२,५९२-०० | |
| ०-०० | ढ) सिध्दीपुर्ती ठेव | १२,३०,२६,२९७-०० | |
| **१,४८,६३२-००** | **वसूलीची बिले** | | **१३,७२,७७०-४०** |
| **६१,३४,२७७-००** | थकव्याज तरतूद | | **९२,६२,५६४-००** |
| **१,६२,७८,७२२-००** | देणे व्याज | | **२,१८,६८,८१३-००** |
| **१,९१,१६,८७७-५५** | **इतर देणी** | | **२,०३,३४,७४९-२९** |
| ९,६२,२५२-५० | मागणी न केलेला लाभांश | ८,३३,९५४-५० | |
| ७८,४७,९००-८८ | अनामत खाते | १,४४,१९,१८७-७९ | |
| ६८,५९०-०० | शेअर्स अनामत | ३,०००-०० | |
| ५,००,०००-०० | ऑडीट फी | ५,००,०००-०० | |
| ८७,०२४-०० | मुदत बाह्य चेक/डी.डी. | ८७,०२४-०० | |
| ११,२७५-०० | टि.डी.एस. देणे | ०-०० | |
| ४२,३२२-०० | पे ऑर्डर | ४९,६०७-०० | |
| १६,६६०-०० | टेलीफोन बिल देणे | १८,४०५-०० | |
| ४७,९००-०० | दिवाबत्ती देणे | ३१,१००-०० | |
| ८,६७,७१९-०० | इतर देणी | ९,२१,७६९-०० | |
| ३०,०००-०० | शिक्षण फंड | ०-०० | |
| ६,३०,०००-०० | बोनस देणे | ९,६४,४४४-०० | |
| ४,४८७-१७ | सरचार्ज देणे | ०-०० | |
| ७९,९९,१८३-०० | आयकर तरतूद | २५,००,०००-०० | |
| १,५६४-०० | पिग्मी एजंट कमिशन | ६,२५८-०० | |
| **१,२४,२१,०८,०२८-३३** | **बेरीज पुढील पानावर** | | **१,५४,१९,८७,३५४-९८** |

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **२५,२०,३६,१६४-५१** | **मागील पान बेरीज** | | **३२,७८,५२,८५८-४२** |
| ३,६२,००,०००-०० | रत्नाकर बँक लि. शाखा जयसिंगपूर | ३,००,००,०००-०० | |
| २,०१,००,०००-०० | दि फेडरल बँक लि. शाखा जयसिंगपूर | १,००,००,०००-०० | |
| ३,००,००,०००-०० | दि कॉसमॉस बँक लि., शाखा कोल्हापूर | ०-०० | |
| १०,०५,००,०००-०० | युनीयन बँक ऑफ इंडीया शाखा जयसिंगपूर | ०-०० | |
| ०-०० | कोटक महिंद्रा बँक लि., शाखा जयसिंगपूर | २,००,००,०००-०० | |
| २३,५०,०००-०० | लॉर्ड बालाजी बँक शाखा सांगली | २३,५०,०००-०० | |
| **८,४९,४७,०००-००** | ट्रेझरी बिलामधील गुंतवणुक | १८,५४,०७,५१५-०० | |
| **१५,२०,६७,८६८-००** | सरकारी कर्जरोखे गुंतवणुक | २६,०७,१८,०५३-०० | |
| **१,०२,०५०-००** | **शेअर्स** | | **१,०२,०५०-००** |
| १,०००-०० | दि एम.एस.सी. बँक लि., मुंबई | १,०००-०० | |
| १,००,९५०-०० | के.डी.सी.सी बँक लि., कोल्हापूर | १,००,९५०-०० | |
| १००-०० | महाराष्ट्र राज्य ग्रामीण विकास बँक मुंबई | १००-०० | |
| **५२,०५,६३,२०१-८४** | **एकूण कर्जे** | | **६५,७८,१७,८२५-५५** |
| २६,५८,९९,९७४-५७ | अल्प मुदतीची कर्जेपैकी | २६,७१,१७,९७०-३० | |
| २६,५४,८२,५२३-५७ | अ) तारणी | २६,६२.५०,७४४-३० | |
| ४,१७,४५१-०० | ब) विनातारणी | ८,६७,२२६-०० | |
| **२१,१८,९१,०७३-०८** | **मध्यम मुदतीची कर्जेपैकी** | ३०,६१,९९,७८९-५६ | |
| २१,१८,९१,०७३-०८ | अ) तारणी | ३०,५०,१०,९९७-५६ | |
| ०-०० | ब) विनातारणी | ११,८८,७९२-०० | |
| **४,२७,७२,१५४-१९** | **दिर्घ मुदतीची कर्जेपैकी** | ८,४५,००,०६५-६९ | |
| ४,२७,७२,१५४-१९ | अ) तारणी | ८,४५,००,०६५-६९ | |
| ०-०० | ब) विनातारणी | ०-०० | |
| **१,४८,६३२-००** | **वसूलीची बिले** | | **१३,७२,७७०-४०** |
| **१,०७,१५,९३४-००** | **व्याज येणे** | | **१,७६,४०,९६५-००** |
| ६१,३४,२७७-०० | अ) थक कर्जावरील | ९२,७०.२०२-०० | |
| २४,४८,९५१-०० | ब) गुंतवणुकीवरील | २९,२७,०४६-०० | |
| २१,३२,७०६-०० | क) सरकारी कर्जरोख्यावरील | ५४,४३,७१७-०० | |
| **१,२०,९७,३०,८५०-३५** | **बेरीज पुढील पानावर** | | **१,५१,३२,६२,०३७-३७** |

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १,२४,२१,०८,०२८-३३ | **मागील पान बेरीज** | | १,५४,१९,८७,३५४-९८ |
| ६७,७३,८५२-२५ | **निव्वळ नफा** | ७७,२७,०१३-४५ | ७७,२७,०१३-४५ |
| | बँक गॅरंटी | | |
| | (संभाव्य देयक रू. ७३,१४,०३५/-) | | |
| १,२४,२१,०८,०२८-३३ | **एकूण** | | १,५४,१९,८७,३५४-९८ |

तपासले शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

| श्री. विनायक आ. कदम | श्री. सुभाष बाबू चौगुले | डॉ. आर. ए. शिंदे |
|---|---|---|
| मुख्य लेखापाल | मुख्य कार्यकारी अधिकारी | चार्टर्ड अकौटंट |



आपल्या खात्यावर जास्तीत जास्त उलाढाल करुन अधिक पतवान व्हा.

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा ताळेबंद पत्रक नं. २

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१,२०,९७,३०,८५०-३५** | **मागील पान बेरीज** | | **१,५१,३२,६२,०३७-३७** |
| **२,२५,३१,७४२-२०** | **स्थावर मालमत्ता** | | **२,७४,९५,५०४-२०** |
| ८३,०८,८५७-०० | जागा व इमारत | १,००,२०,५१०-०० | |
| ६४,०५,२०३-०० | कॉम्प्युटर डेडस्टॉक | ६१,७९,५९४-०० | |
| ७६,८३,१७५-२० | डेडस्टॉक | १,११,८७,३९५-२० | |
| ३,१२८-०० | लायब्ररी | २,९०२-०० | |
| १,३१,३७९-०० | वाहन | १,०५,१०३-०० | |
| **१,६२,६६,६४७-९२** | **इतर येणी** | | **८६,१०,८८१-००** |
| १५,१८५-०० | लाईट डिपॉझीट | ३२,२५५-०० | |
| ६,४१९-९२ | टेलिफोन डिपॉझीट | ७,३८७-०० | |
| १०,०१३-०० | लवाद डिपॉझीट | ६,८६३-०० | |
| ५८,०००-०० | विमा प्रिपेड | ६२,०००-०० | |
| १४,३९४-०० | टि.डी.एस. | ८,५७८-०० | |
| २४,२८१-०० | ॲडव्हान्स खाते | १०,२५०-०० | |
| १४,२००-०० | लॉकर भाडे येणे | ३९,२५०-०० | |
| १,४३,१८,९०७-०० | ॲडव्हान्स इन्कम टॅक्स | ६३,००,०००-०० | |
| १८,०५,२४८-०० | इतर येणी | १८,०५,२४८-०० | |
| ०-०० | सरकारी कर्जमाफी योजना २००९ | ३,३९,०५०-०० | |
| **३,५२,६४०-११** | **शिल्लक छपाई** | ३,४५,९४५-८६ | **३,४५,९४५-८६** |
| **१,२४,८८,८१,८८०-५८** | **एकूण** | | **१,५४,९७,१४,३६८-४३** |

**श्री. महेंद्र आप्पाण्णा बागी**
व्हाईस चेअरमन

**श्री. महादेव बाबू राजमाने**
चेअरमन

*** संचालक मंडळ ***

श्री आण्णासाहेब रेवगोंडा पाटील
श्री. आदीनाथ बाळा कुडचे
श्री. शिवाजी शंकर पोळ
सौ. मंगलादेवी दरगू गावडे
श्री. भूपाल गोविंद खामकर
श्री. बापूसो नरसु चौगुले
श्री. राजेश बसलिंगाप्पा सानिकोप
श्री. गणपतराव आप्पासाहेब पाटील-तज्ञ संचालक
श्री. दामोदर शंकर सुतार
श्री. सुरेश भूपाल पाटील
श्री. आप्पासो रामू नरुटे
श्री. महादेव विठ्ठल पाटील - तज्ञ संचालक
श्री. रमेश विठ्ठल पाटील
श्री. बाबू शिवाप्पा गौराज
सौ. विनया रमेश घोरपडे
श्री. मिलींद आनंदराव जगदाळे - कर्मचारी प्रतिनिधी

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **६,६२,५४,४२९-०३** | **एकूण दिलेले व्याज** | | ९,२३,१६,०२९-०० |
| ६,५९,६६,००३-०० | ठेवीवरील व्याज | ९,१९,६०,७५०-०० | |
| २,४३,२२६-०० | कर्जावरील व्याज | ३,५५,२७९-०० | |
| ४५,२००-०३ | रिबेट | ०-०० | |
| **८९,१५,९७८-००** | **पगार व भत्ते** | | १,०९,२१,९४२-८३ |
| ३४,७६,८६३-०० | पगार | ३७,०३,४४६-८३ | |
| २८,६९,८२७-०० | महागाई | ४१,८२,६५४-०० | |
| ६,४१,५८७-०० | प्रॉव्हीडंड फंड | ८,४०,३९१-०० | |
| ४,२२,५५२-०० | हक्काचे रजेचा पगार | ४,७८,८०२-०० | |
| २,१४,८९०-०० | ग्रॅच्युईटी | ३,२७,९०९-०० | |
| १,२६,९३३-०० | अलौन्स | १,४६,५३३-०० | |
| २०,१५७-०० | बोनस | ०-०० | |
| १०,९२,९८९-०० | नोकर प्रवास खर्च | १२,४२,२०७-०० | |
| ५०,१८०-०० | कर्मचारी अपघाती विमा | ०-०० | |
| **१६,७३,५२९-००** | **भाडे, कर, विमा व दिवाबत्ती** | | २४,१७,५०९-०० |
| ३,३०,८००-०० | ऑफीस भाडे | ४,८२,०००-०० | |
| २८,०००-०० | क्लिअरिंग हाऊस भाडे | २९,५३३-०० | |
| ४९,६५४-०० | टॅक्स व परमीट | १,१४,९११-०० | |
| २,५००-०० | संस्था व्यवसाय कर | २,५००-०० | |
| ५०,१२३-०० | विमा | ६२,७४५-०० | |
| ४,३५,७७०-०० | दिवाबत्ती | ५,६७,२८०-०० | |
| ७,७५,६८२-०० | डी.आय.सी.जी.सी. प्रिमीअम | ११,५८,४९०-०० | |
| १,०००-०० | आयकर | ५०-०० | |
| **७५,७१,३१३-७६** | **इतर खर्च** | | १,०४,११,५८०-२९ |
| ३१,७०६-०० | वकील फी | ११,५००-०० | |
| ९,९९९-०० | कायदेशीर सल्लागार फी | ७८,२१०-०० | |
| १०,३००-०० | ऑडीट फी | ८४,७९६-०० | |
| ३४,१७,५३६-०० | घसारा | ४०,५१,४९७-०० | |
| २,३१,८८६-९३ | स्टेशनरी सादीलवार | ३,३९,७२६-४० | |
| १,६५,७५२-०८ | टेलीफोन | २,०१,५०१-९२ | |
| ९६,५५८-०० | प्रवास खर्च | ८३,८०२-०० | |
| १,९२,१५१-९५ | ऑफीस खर्च | २,०६,०५८-०० | |
| ४३,९८०-०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १,०७,४२६-०० | |
| १,०५,३६७-०० | शाखा उद्घाटन खर्च | ९९,०५५-०० | |
| २५,६४१-७० | वाहन पेट्रोल खर्च | ०-०० | |
| १०,६५१-०० | किरकोळ खर्च | ४,४४५-०० | |
| ८,११,८५,४६५-६९ | **बेरीज पुढील पानावर** | | ११,०९,२३,४९८-१५ |

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | उत्पन्न | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ९,१३,८९,९९९-९८ | **एकूण मिळालेले व्याज** | | १२,३६,९५,१२७-८५ |
| ६,३८,१७,१५२-३८ | कर्जावरील व्याज | ८,१८,६१,३५९-०० | |
| १,१७,४१,४३५-४६ | सरकारी कर्जरोख्यावरील व्याज | १,६८,७५,३६१-०१ | |
| १,१२,७९,९७९-६१ | गुंतवणुकीवरील व्याज | १,२४,५८,६८०-९७ | |
| २०,१४,५७४-०० | ट्रेझरी बिलावरील व्याज | ६५,३८,६८१-३० | |
| २५,३६,८५८-५३ | म्युचल फंडावरील व्याज | ५९,६१,०४५-५७ | |
| ४७,४७,८९२-०६ | **इतर उत्पन्न** | | ६३,९४,७६१-७२ |
| ३,३५,५६९-५२ | कमीशन | ३,८९,९४६-२५ | |
| ८,५००-०० | पिग्मी मशीन भाडे | ८,०५०-०० | |
| १,१३,८५५-०० | लॉकर भाडे | १,४८,०८०-०० | |
| ३५,७१५-०० | फॉर्म फी | ५९,४७५-०० | |
| २२,२७,४६६-५४ | मेंटेनन्स चार्जेस | १६,५०,३२७-७० | |
| १०,४६५-०० | टपाल व तार | २३,३०७-०० | |
| २१,८२१-०० | इतर उत्पन्न | ३,५९,२४५-८७ | |
| १९,९४,५००-०० | गुंतवणूक विक्रीतील नफा | १८,१६,२५९-०० | |
| ०-०० | प्रोसेसिंग चार्जेस | १९,४०,०००-९० | |
| ०-०० | लाभांश | ७०-०० | |
| ९,६१,३७,८९२-०४ | **बेरीज पुढील पानावर** | | १३,००,८९,८८९-५७ |

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ८,११,८५,४६५-६९ | **मागील पान बेरीज** | | ११,०९,२३,४९८-१५ |
| ८७,४१६-०० | समारंभ खर्च | ६०,५७६-०० | |
| २३,३६३-०० | संचालक मंडळ मिटींग खर्च | २३,७४९-०० | |
| ४६,९१०-०० | कॉम्प्युटर देखभाल खर्च | १२,६१५-०० | |
| २२७४-०० | वाहन दुरुस्ती खर्च | ४,८०३-०० | |
| ३८०-०० | रक्षणावळ | २६०-०० | |
| ६,६२५-०० | वर्तमान पत्र | १०,३०९-०० | |
| १,६१,१२७-०० | छपाई आणि जाहीरात | १,५३,८८३-९७ | |
| ३०,०००-०० | शिक्षण फंड | ०-०० | |
| ५,८८,६५५-०० | दुरुस्ती | २,८२,२२८-०० | |
| १,६८,४२८-०० | संचालक मंडळ भत्ते | १,८८,७४५-०० | |
| ७,०००-०० | वर्गणी | २१,७५०-०० | |
| ९,२१,१९१-५० | पिग्मी एजंट कमीशन | ११,७३,२५३-०० | |
| ३६,०००-०० | कॉम्प्युटर सल्लागार फी | ४१५१६-०० | |
| १६,१५८-०० | कोर्ट खर्च | १०,७९६-०० | |
| ७,००,०००-०० | मुख्यमंत्री दुष्काळ निधी | ०-०० | |
| २,२३,३०६-०० | कनेक्टीव्हीटी रेंट | ६,०७,३५७-०० | |
| २९,१३३-०० | नोकर प्रशिक्षण खर्च | ७९,४३७-०० | |
| १,८१,८१७-६० | ए. एम. सी. चार्जेस | ३,७२,२८५-०० | |
| ०-०० | गुंतवणुक घसारा निधी | २१,००,०००-०० | |
| ४९,४८,७९०-०० | **तरतुदी** | | ६२,९५,८१५-०० |
| ०-०० | संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद | ७,८०,०००-०० | |
| ५,००,०००-०० | ऑडीट फी तरतूद | ५,००,०००-०० | |
| २४,००,०००-०० | आयकर तरतूद | २५,००,०००-०० | |
| ६,३०,०००-०० | बोनस तरतूद | ९,५०,०००-०० | |
| ९,१८,७९०-०० | सरकारी कर्ज रोखे अधिमुल्य निर्लेखन | १०,६५.८१५-०० | |
| ०-०० | गुंतवणूक घसारा निधी तरतूद | ०-०० | |
| ५,००,०००-०० | उत्तम जिंदगी तरतूद | ५,००.०००-०० | |
| ६७,७३,८५२-२५ | निव्वळ नफा | | ७७,२७,०१३-४५ |
| ९,६१,३७,८९२-०४ | **एकूण** | | १३,००,८९,८८९-५७ |

तपासले शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| **श्री. विनायक आ. कदम** | **श्री. सुभाष बाबू चौगुले** | **डॉ. आर. ए. शिंदे** |
| मुख्य लेखापाल | मुख्य कार्यकारी अधिकारी | चार्टर्ड अकौटंट |

## दिनांक ३१-३-२०१४ अखेरचा नफा-तोटा पत्रक नं. ३

| दि. ३१-३-२०१३ रूपये पैसे | भांडवल व देणी | रूपये पैसे | दि. ३१-३-२०१४ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ९,६१,३७,८९२-०४ | मागील पान बेरीज | | १३,००,८९,८८९-५७ |
| ९,६१,३७,८९२-०४ | एकूण | | १३,००,८९,८८९-५७ |

**श्री. महेंद्र आप्पाण्णा बागी**
व्हाईस चेअरमन

**श्री. महादेव बाबू राजमाने**
चेअरमन


*** संचालक मंडळ ***

श्री आण्णासाहेब रेवगोंडा पाटील
श्री. आदीनाथ बाळा कुडचे
श्री. शिवाजी शंकर पोळ
सौ. मंगलादेवी दगू गावडे
श्री. भूपाल गोविंद खामकर
श्री. बापूसो नरसु चौगुले
श्री. राजेश बसलिंगाप्पा सानिकोप
श्री. गणपतराव आप्पासाहेब पाटील-तज्ञ संचालक
श्री. दामोदर शंकर सुतार
श्री. सुरेश भूपाल पाटील
श्री. आप्पासो रामू नरुटे
श्री. महादेव विठ्ठल पाटील - तज्ञ संचालक
श्री. रमेश विठ्ठल पाटील
श्री. बाबू शिवाप्पा गौराज
सौ. विनया रमेश घोरपडे
श्री. मिलींद आनंदराव जगदाळे - कर्मचारी प्रतिनिधी

## NOTES FORMING PART OF BALANCE SHEET AS AT 31ST MARCH, 2014 AND PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2014

*SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES*

**(1) Accounting convention :**

a) The financial statements are drawn up in accordance with the historical cost convention and on going concern basis.

b) Items of income and Expenditure are accounted for on accrual basis, unless otherwise stated.

**(2) Revenue / Expenditure Recognition :**

a) Interest on performing advances is recognized on accrual basis.

b) Interest on non performing advances is on realisation basis.

c) Interest on fixed income securities is recognized on accrual basis.

d) Commission, Locker rent, income on the bank guarantees is recognized as income on realization

e) Other items of income are recognized on realization basis.

f) Revenue expenditure is accounted for generally on accrual basis.

**(3) Advances :**

a) Advances are classified into standard, sub-standard, doubtful and loss assets in accordance with the guidelines issued by the R.B.I.

b) Provision for sub-standard, doubtful and loss assets is made in accordance with the guidelines issued by R.B.I.in addition a general provision is also made on all standard assets as per R.B.I. guidelines.

**(4) Investments :**

a) The bank has classified the investments in accordance with R.B.I. guidelines applicable to Urban Co-op. Banks. Accordingly, classification of investments for the purpose of valuation is done under the following categories.
(i) Held to maturity (HTM),(ii) Available for Sale (AFS),

b) Premium, if any, on investment under HTM category is amortised over the residual life of the investment.

c) Investments under "HFT" and "AFS" categories have been marked to market on the basis of guidelines issued by RBI. while net deprciation, if any, under each of the categories has been provided for, net appreciation, if any has been ignored

d) Investments are grouped under following three heads for disclosure in Balance Sheet as per RBI guidelines.
(i) Central Government Securities(ii) Treasury Bills(iii) Shares in Co-op. Institutions.

**(5) Fixed Assets and Depreciation :**

a) Fixed assets (Building) are stated at acquisition price less derpeciation provided, other fixed assets are stated at written down value.

b) Depreciation on fixed assets is provided for on the W.D.V. method at the rates prescribed by the management as under.
(i) Furniture & Fixture 10%(ii) Computer & Software 33.33%
iii) Dead Stock 10%(iv) Library 10%

c) Depreciation on Fixed assets is charged for full year if assets is purchased and installed during the first six months of the year. If the assets is purchase and installed in the last six months then 50% of normal of deprciation is charged. No depreciation is charged on fixed assets sold during the year.

**(6) Retirement Benefits : (AS-15)**

a) Provident fund and family pension Scheme contributions are deposited in the Office of the PF Commissioner and and are accounted for on actual payment basis.

b) Contribution to Group Gratuity Scheme of Life Insurance Corporation of India is made on the basis of actuarial valuation done by LIC and the same is charged to Profit and Loss Account.

**(7) Taxes on Income : (AS - 22)**

a) Provision for current Tax is made as per provision of income Tax Act. 1961 on basis of estimated taxable income for the year.

**(8) Other Notes :**

a) Reconciliation of Inter Branch Adjustment and Inter Bank Accounts as on 31-03-2014 are completed. Follow up for elimination of pending items therein is in progress.

b) Previous year figures are regrouped or rearranged or classified wherever necessary to confirm the layout of the accounts of the currents year.

**(9) Net Profit :**

Net Profit has been arrived at after provisions on Performing Assets, Non Performing Assets, Investment Depreciation as fund and other usual and necessary provisions as per R.B.I. norms.



सर्व शाखांमार्फत आर. टी. जी. एस. सुविधा उपलब्ध आहे.

## भांडवल पर्याप्तता प्रमाण

भागभांडवल व स्वनिधीचे जोखीम संपत्तीशी प्रमाण ( सी. आर. ए. आर. ) १२.२८ टक्के असुन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सदरचे प्रमाण ९.०० % किमान राखणे बंधनकारक आहे. त्यामुळे हे प्रमाण भांडवल पर्याप्तता प्रमाणाची उत्तम स्थिती

### भांडवल पर्याप्तता निकषाची स्थिती दर्शविणारा तक्ता (आकडे लाखांत)

| तपशील | मार्च २०१३ | मार्च २०१४ | वाढ / घट |
|---|---|---|---|
| कॅपिटल - टायर १ | ६०५.८३ | ७४३.१९ | १३७.३६ |
| कॅपिटल - टायर २ | ५३.४० | ५८.४० | ५.०० |
| (१+२) | ६५९.२३ | ८०१.५९ | १४२.३६ |
| रिस्क वेटेट ॲसेटस | ५३८५.३९ | ६२२६.४० | ११४१.०१ |
| भांडवल पर्याप्तता प्रमाण | १२.२४% | १२.२८% | ०.०४% |

### उत्तम जिंदगी तरतूद तुलनात्मक स्थिती (आकडे लाखांत)

| अ.नं. | तपशील | सुरवातीची शिल्लक | चालु वर्षातील वाढ | चालु वर्षातील घट | वर्ष अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१२-२०१३ | १४.०० | ५.०० | -- | १९.०० |
| २. | २०१३-२०१४ | १९.०० | ५.०० | -- | २४.०० |

### संचालक व नातेवाईक यांना दिलेली कर्जे (दि. ०१.०१.२०१३ ते ३१.०३.२०१४ अखेर) (आकडे लाखांत)

| अ.नं. | तपशील | वर्षाची सुरुवातीची येणे बाकी | चालु सह वर्षात नवीन संचालकांची कर्जाऊ रक्कम | चालु सह वर्षात परत फेड रक्कम | चालु सह वर्षा अखेर येणे बाकी | येणे रक्कम पैकी थकीत रक्कम | मार्च नंतर थकबाकी पैकी वसुल रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १<br>२. | संचालक<br>नातेवाईक | | निरंक | | | | |
| | एकूण रुपये | | | | | | |

### ठेव विमा योजना

बँकेने अहवाल सालामध्ये ठेव विमा Deposit Insurance and Credit Guarantee Corporation of India कडे हप्ते भरलेले असून त्यांचा तपशील

| अ.नं. | कालावधी | विमा हप्ता भरलेची तारीख | विमा प्रिमियमची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दिनांक : ०१.०४.२०१३ ते ३०.०९.२०१३ | ०९.०५.२०१३ | ५,६५,५५०/- |
| २. | दिनांक : ०१.१०.२०१३ ते ३१.०३.२०१४ | १४.१०.२०१३ | ५,९२,९४०/- |
| ३. | दिनांक : ०१.०४.२०१४ ते ३०.०९.२०१४ | २८.०४.२०१४ | ७,९२,७९६/- |

## सन २०१४-२०१५ सालाकरिता संचालक मंडळाने सुचविलेले उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक

| अ.नं | खात्याचा तपशील | सन २०१३-१४ करीता मंजूर बजेट रूपये पैसे | सन २०१३-१४ मधील प्रत्यक्ष खर्च रूपये पैसे | अंदाजापेक्षा जादा खर्च रूपये पैसे | अंदाजापेक्षा कमी खर्च रूपये पैसे | सन २०१४-१५ करीता अंदाजे बजेट रूपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पगार | १२००००००.०० | १०९२१९४२.८३ | | १०७८०५७.१७.०० | १३००००००.०० |
| २. | प्रवास खर्च | २५००००.०० | ८३८०२.०० | | १६६१९८.०० | १५००००.०० |
| ३. | ऑफिस भाडे/ रक्षणावळ | ६०००००.०० | ४८२२६०.०० | | ११७७४०.०० | ६०००००.०० |
| ४. | टेलीफोन | २५००००.०० | २०१५०१.९२ | | ४८४९८.०८ | २५००००.०० |
| ५. | टपाल व तार | ५००००.०० | ०.०० | | ५००००.०० | २५०००.०० |
| ६. | समारंभ खर्च/वर्गणी/वर्तमान पत्र | १२५०००.०० | ९२६३५.०० | | ३२३६५.०० | १२५०००.०० |
| ७. | स्टेशनरी सादीलवार | ४०००००.०० | ३३९७२६.४० | | ६०२७३.६० | ४०००००.०० |
| ८. | विमा | ७५०००.०० | ६२७४५.०० | | १२२५५.०० | ७५०००.०० |
| ९. | छपाई व जाहिरात | ५०००००.०० | १५३८८३.९७ | | ३४६११६.०३ | ५०००००.०० |
| १०. | वार्षीक साधारण सभा खर्च | १५००००.०० | १०७४२६.०० | | ४२५७४.०० | ३०००००.०० |
| ११. | ऑडीट फी | ७०००००.०० | ५८४७९६.०० | | ११५२०४.०० | ७०००००.०० |
| १२. | घसारा | ४००००००.०० | ४०५१४९७.०० | ५१४९७.०० | | ६०००००.०० |
| १३. | संचालक मंडळ भत्ते/ खर्च | २५००००.०० | २१२४९४.०० | | ३७५०६.०० | २५००००.०० |
| १४. | शिपाई ड्रेस | ५००००.०० | ०.०० | | ५००००.०० | ७००००.०० |
| १५. | पिग्मी कमीशन / कमीशन | १२०००००.०० | ११७३२५३.०० | | २६७४७.०० | १५०००००.०० |
| १६. | वाहन खर्च | १०००००.०० | ४८०३.०० | | ९५१९७.०० | ५००००.०० |
| १७. | कोर्ट खर्च/कॉम्प्युटर सल्लागार फी | २०००००.०० | १४६४६७.०० | | ५३५३३.०० | ३०००००.०० |
| १८. | ऑफिस खर्च | ३०००००.०० | २०६०५८.०० | | ९३९४२.०० | ३०००००.०० |
| १९. | दुरुस्ती | ५०००००.०० | २८२२२८.०० | | २१७७७२.०० | २०००००.०० |
| २०. | दिवाबत्ती | ७०००००.०० | ५६७२८०.०० | | १३२७२०.०० | ७०००००.०० |
| २१. | नोकरी प्रशिक्षण खर्च | १०००००.०० | ७९४३७.०० | | २०५६३.०० | २०००००.०० |
| २२. | क्लिरिंग हाऊस भाडे | ४००००.०० | २९५३३.०० | | १०४६७.०० | ४००००.०० |
| २३. | ठेवी वरील व कर्जावरील व्याज | ८००००००००.०० | ९२३१६०२९.०० | १२३१६०२९.०० | | ११००००००००.०० |
| २४. | डिपॉझिट इन्शुरन्स प्रिमीअम | १००००००.०० | ११५८४९०.०० | १५८४९०.०० | | २०००००.०० |
| २५. | संस्था व्यवसाय कर | २५००.०० | २५००.०० | | ०.०० | २५००.०० |
| २६. | कॉम्प्युटर देखभाल | ६०००००.०० | ३८४९००.०० | | २१५१००.०० | ६०००००.०० |
| २७. | गुंतवणुक घसारा निधी तरतूद | ३०००००.०० | २१०००००.०० | १८०००००.०० | | १००००००.०० |
| २८. | आयकर तरतूद | ४००००००.०० | २५०००००.०० | | १५०००००.०० | ४००००००.०० |
| २९. | संशयित व बुडीत कर्ज निधी तरतूद | १००००००.०० | ७८००००.०० | | २२०००० | १००००००.०० |
| ३०. | शाखा उद्घाटन खर्च | १०००००.०० | ९९०५५.०० | | ९४५.०० | ५००००.०० |
| ३१. | कनेक्टीव्हीटी रेंट | ४०००००.०० | ६०७३५७.०० | २०७३५७.०० | | ७०००००.०० |
| ३२. | उत्तम जिंदगी तरतूद | ३०००००.०० | ५०००००.०० | २०००००.०० | | ५०००००.०० |
| ३३. | इतर कर | १०००००.०० | ११४९६१.०० | १४९६१.०० | | १२००००.०० |
| ३४. | कर्जेरोखे अधिमुल्य निर्लेखन | ९१८७९०.०० | १०६५८१५.०० | १४७०२५.०० | | १०६५८१५.०० |
| ३५. | बोनस तरतूद | ०.०० | ९५००००.०० | ९५००००.०० | | १२०००००.०० |
| | **एकूण** | **१११२६१२९०.००** | **१२२३६२८७६.१२** | **१५८४५३५९.००** | **४७४३७७२.८८** | **१४०७७३३१५.००** |

२०१४-१५ या सालातील उत्पन्न रु. १५८३.०० लाख मिळेल तरतूद पूर्व नफा रु. १७५.०० लाख राहील.

| श्री. विनायक आ. कदम | श्री. सुभाष बाबू चौगुले | श्री. महेंद्र आप्पाण्णा बागी | श्री. महादेव बाबू राजमाने |
|---|---|---|---|
| मुख्य लेखापाल | मुख्य कार्यकारी अधिकारी | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

# ANNEXURE "A"

| | | |
|---|---|---|
| Name of the Bank | : | **JAYSINGPUR UDGAON SAHAKARI BANK LTD. JAYSINGPUR.** |
| Head Office Address | : | Kolhapur Road, Opp. Police Station<br>Jaysingpur-416101, Tal. Shirol<br>Dist. Kolhapur Maharashtra 02322-225277 |
| Date of Registration | : | 22.06.1960 |
| Date & RBI Licence No. | : | UBD/ MH/ 956 p Dtd. 31.12.1987 |
| Jurisdiction | : | Kolhapur and Sangli Districts |

## Position As on 31st March 2014

| | | | | |
|---|---|---|---|---|
| No. of Branches Including Head Office | : | 1+10 Branches = 11 | | |
| Membership | : | Regular | - 10505 | |
| | : | Nominal | - 1980 | |
| Paid up Share Capital | : | Rs. 323.73 Lakhs | | |
| Total Reserves &Other Funds | : | Rs.788.49 Lakhs | | |
| Deposits | : | Saving | Rs. | 3831.61 Lakhs |
| | | Current | Rs. | 831.82 Lakhs |
| | | Fixed | Rs. | 9115.83 Lakhs |
| | | **Total** | **Rs.** | **13779.26 Lakhs** |
| Advances | : | Secured | Rs. | 6557.62 Lakhs |
| | | Unsecured | Rs. | 20.56 Lakhs |
| | | **Total** | **Rs.** | **6578.18 Lakhs** |
| Borrowings | : | Nil | | |
| Investments | : | Rs. 5735.09 Lakhs | | |
| Overdues % (Percent) | : | 8.56 % | | |
| Audit Classification | : | **"A"** Grade | | |
| Profit for the year | : | Rs. 77.27 Lakhs | | |
| Total Staff | : | 82 | | |
| Working Capitals | : | Rs. 15390.78 Lakhs | | |

## Our Branches

| | | | |
|---|---|---|---|
| Jaysingpur Br. | Tel. No. (02322) 226977 | Kavate Guland Br. | Tel No. (02322) 276611 |
| Kurundwad Br. | Tel. No. (02322) 244296 | Sangli Br. | Tel No. (0233) 2330666 |
| Dattanagar Br. | Tel. No. (02322) 237888 | Khidrapur Br. | Tel No. (02322) 265777 |
| Abdul Lat Br. | Tel. No. (02322) 254877 | Yadrav Br. | Tel No. (02322) 252527 |
| Chandur Br. | Tel. No. (0230) 2392177 | Dattawad Br. | Tel No. (02322) 241777 |

# DISCLOSURE OF ADDITIONAL INFORMATION AS PER RBI CIRCULARS

| Sr.No. | Particulars | 31.03.2013 | 31.03.2014 |
|---|---|---|---|
| 1. | **Capital to Risk Asset Ration (CRAR)** | 12.24% | 12.28% |
| 2. | **Investment in G. Sec.** | | |
| | i) Book Value | 1520.68 | 2607.18 |
| | ii) Face Value | 1475.00 | 2575.00 |
| | iii) Market Value | 1403.57 | 2326.36 |
| 3. | **Advances against Real Estate, Construction Business & Housing** | | |
| | i) Real Estate | 0.00 | 300.62 |
| | ii) Housing | 513.32 | 583.16 |
| | iii) Builders and Developers | 0.00 | 0.00 |
| 4. | **Advances against Shares and Debentures** | 0.00 | 0.00 |
| 5. | **Advances to Directors, their relatives, companies / firms in which they are interested** | | |
| | i) Fund Based | 0.00 | 0.00 |
| | ii) Non Fund Based | 0.00 | 0.00 |
| 6. | **NPAs :** | | |
| | i) Gross NPAs Amount | 234.82 | 364.22 |
| | ii) Net NPAs Amount | 0.00 | 59.22 |
| 7. | **Movement of NPAs** | | |
| | Opening Balance | 211.34 | 234.82 |
| | Add : Additions during the year | 476.26 | 668.24 |
| | Less : Recovery during the year | 452.78 | 538.84 |
| | Closing Balance | 234.82 | 364.22 |
| 8. | **Average Cost of Deposits** | 8.18% | 8.40% |
| 9. | **Profitability :** | | |
| | i) Interest income as a percentage of working funds | 7.35% | 8.04% |
| | ii) Non interest income as a percentage of working funds | 0.38% | 0.42% |
| | iii) Operating Profit as percentage of working funds | 0.94% | 0.91% |
| | iv) Returns on Assets | 0.72% | 0.61% |
| | v) Business per employee | 208.45 | 248.26 |
| | vi) Profit per employee | 0.87 | 0.94 |
| 10. | **Movements is provision** | | |
| | i) Towards NPAs (BDDR) | 297.20 | 305.00 |
| | ii) Towards Depreciation on Investments | 18.10 | 39.10 |
| | iii) Towards Investments Fluctuation Reserve | 0.00 | 0.00 |
| | iv) Towards Standard Assets | 19.00 | 24.00 |
| 11. | **Foreign currency assets and liabilities** | 0.00 | 0.00 |
| 12. | **Non SLR Investments** | 0.00 | 0.00 |